अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# गुन्हेगार जामिनावर आणि कायदाच फासावर

कायदा–सुव्यवस्था ही केवळ समाजासाठी असते असे म्हणण्याचे दिवस आता संपुष्टात येऊ लागले आहेत. कायदा–सुव्यवस्था ही आता भारतातल्या राजकारण्यांच्या आणि सत्ताधाऱ्यांच्या हुकूमशाही पध्दतीचे एक अस्त्र होऊ पहात आहे. माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या हत्येतील सातही आरोपींना मुक्त करण्याचा राजकीय निर्णय हा अशाच हुकूमशाही पध्दतीचा नमुना ठरतो. तामिळनाडूतल्या द्रविड मुन्नेत्र कळघम पक्षाच्या आणि तेथील सर्वेसर्वा श्रीमती जयललिता यांनी आपल्या मंत्रिमंडळाची तातडीची बैठक घेऊन राजीव गांधींच्या सातही मारेकऱ्यांना मोकळे सोडण्याचा निर्णय जाहीर केला आहे. त्यापूर्वी या हत्याकांडात मोठी भूमिका बजावलेल्या संथान, मुरूगन आणि पेरारीवलन या तिघांची फाशीची शिक्षा रद्द करण्याचा आणि त्याऐवजी जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला. त्याचा गैरफायदा घेत जयललिता यांची तामिळी अस्मिता उफाळून आली. त्यांनी कोणत्याही सामाजिक नीतीनियमांचा किंवा नियमांचा विचार न करता सातहीजणांना मोकळे करण्याचा धक्कादायक निर्णय घेतल. एकतर सर्वोच्च न्यायालयाने फाशीची शिक्षा जन्मठेपेत रुपांतरित करण्याचा निर्णय घेऊन एकूणच मोठे प्रश्नचिन्ह निर्माण केले आणि त्याच्यावर कडी करणारी राजकीय कुरघोडी करून जयललिता यांनी या तिघांसह सात जणांना मुक्त करण्याचे ठरवले. राज्य सरकारला असलेल्या घटनादत्त अधिकाराचा वापर जरी केला तरीसुध्दा, एका माजी पंतप्रधानाच्या हत्येतल्या आरोपींना पूर्णपणे मोकाट सोडणे कितपत योग्य आहे? याचा त्यांनी अजिबात विचार केलेला दिसत नाही. ज्याप्रमाणे इकडे महाराष्ट्रात राज्य सरकार आपल्याच अधिकाराचा वापर करून संजय दत्तचा पॅरोल मनमानी पध्दतीने वाढवत आहे. राज्यातले जवळपास सव्वाशे कैदी गेल्या वर्षभरापासून पॅरोल मिळवण्यासाठी प्रयत्न करत आहेत. त्यांच्याबाबतीत विचार करायला सरकारला वेळ नाही. पण संजय दत्तबाबत सरकारने दाखवलेली तत्परता ही एकूणच कायदा सुव्यवस्थेला नख लावणारी ठरते. म्हणजे पंतप्रधानांच्या हत्येतील आरोपींना मोकाट सोडण्याचा जयललितांचा निर्णय किंवा संजय दत्तला पाहिजे तितक्या वेळा पॅरोल देण्याचा निर्णय हे पायंडे जर असेच पडत गेले, तर भविष्यकाळामध्ये एका फार मोठ्या धोक्याला राजकारणी आणि सत्ताधारी आमंत्रण देत आहेत असे म्हणावे लागेल. हा सगळा प्रकार पाहिल्यानंतर या दोन्ही घटनांमधून आरोपी जामिनावर आणि कायद्यालाच मात्र फाशी चढवण्याचा घाट घातला जात आहे असे म्हणण्याशिवाय पर्याय उरत नाही.

### प्रादेशिक नव्हे राजकीय अस्मिता

सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय अनेकांसाठी आश्चर्यकारक होता. आरोपींना झालेली फाशीची शिक्षा न्यायालयाने जन्मठेपेत परावर्तित केली. त्यावेळी सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारच्या निकम्मेपणावरच एकाअर्थी बोट ठेवले. फाशीची शिक्षा ठोठावून अकरा वर्षे उलटली तरी सरकारने त्याची अंमलबजावणी केली नाही. या आरोपींनी केलेल्या दयेच्या अर्जांवरही निर्णय घेतले नाहीत. सरकारने केलेल्या या चालढकलीचा फायदा आरोपींना घेतला. सरकार फाशीची अंमलबजावणी करत असल्यामुळे आमच्या जगण्याच्या अधिकारावर आक्रमण होते. अशा प्रकारचा युक्तिवाद त्यांनी केला. परंतु एका पंतप्रधानाची हत्या करून त्याचे जगणेच नाकारणाऱ्या या गुन्हेगारांना खरेतर जगण्याचा नैतिक अधिकार उरत नाही. हा जगण्याचा अधिकार मिळावा किंवा आपले निरपराधित्व सिध्द करता यावे, म्हणून त्यांना योग्य ती संधी दिली गेली होती. सगळ्या कायदेशीर प्रक्रियेनंतर हे आरोपी न्यायालयाला दोषी वाटले. म्हणूनच त्यांना फाशीची शिक्षा ठोठावली गेली आणि आता अकरा वर्षांनंतर न्यायालयाला त्यांच्या शिक्षा सौम्य करण्याचा विचार करावा लागला, हाच त्यातला आश्चर्याचा भाग ठरतो. अर्थातच न्यायालयावर अशा प्रकारची वेळ आणण्याचे काम केंद्र सरकारच्या गृहविभागाने केले. राष्ट्रपतींनीसुध्दा याबाबत वेगवेगळे निर्णय घेतले नाहीत. या सगळ्या परिस्थितीचा राजकीय फायदा उठवण्याचे काम जयललिता यांनी केले आहे. किंबहुना त्यांनी सगळ्या मर्यादा मर्यादा ओलांडून सातही जणांना मोकळे करण्याचे ठरवले आहे. श्रीलंकेतल्या तामिळ आणि सिंहली यांच्यातील संघर्षाचा परिणाम म्हणूनच राजीव गांधी यांच्या हत्या झाली होती. श्रीलंकेत शांतता पथक पाठवण्याचा त्यांचा निर्णय तामिळनाडूतल्या तामिळी लोकांना मानवलेला नव्हता. श्रीलंकेतल्या तामिळ इलमचे पुरस्कर्ते प्रभाकरन यांनादेखील तामिळनाडूतल्या सगळ्या राजकीय पक्षांचा पाठिंबा होता. हीच तामिळी अस्मिता अनेक दिवस खदखदत होती. श्रीलंकेतल्या संघर्षामुळे तामिळनाडूतही शस्त्रास्त्रे खेळू लागली होती. तिथल्या बदलत्या राजकीय वातावरणातूनच राजकीय हिंसाचार उफाळला आणि त्यात राजीव गांधींची हत्या झाली.

### अनाठायी दयाभाव धोक्याचा

केवळ प्रादेशिक अस्मितेचे हे भूत इतक्या टोकाला जात असेल आणि भारताच्या घटनात्मक अधिकारांनाही आव्हान देण्याची वेळ येत असेल तर मात्र त्याचा गंभीरपणे विचार करायला हवा. फाशीची शिक्षा या पध्दतीने जन्मठेपेत रुपांतरित व्हायला लागली, तर अशा निर्णयाचा फायदा अनेक गुन्हेगार घेऊ शकतील. आणि म्हणूनच या शिक्षा सुनावताना त्याची ठराविक मुदतीत अंमलबजावणी करण्याचे आदेशही न्यायालयाने दिले पाहिजेत. वाटल्यास तशी सुधारणा कायद्यात केली पाहिजे. एवढेच नव्हे तर राष्ट्रपतींकडे दयेचा अर्ज केल्यानंतर त्यावरदेखील विशिष्ट मुदतीत निर्णय घेण्याचे बंधन घालायला हवे. त्यातला संवेदनशील भाग असा आहे की, एखाद्याच्या फाशीची सजा कायम करण्याचा निर्णय घेताना राष्ट्रपतींच्या मनात दयाभाव उत्पन्न होऊ शकतो किंवा संभ्रमावस्थाही निर्माण होऊ शकते. यामुळेच आज शेकडो आरोपींचे दयेचे अर्ज तसेच पडून आहेत. हा निर्णय एकट्या राष्ट्रपतींवर न सोपवता त्यासाठीसुध्दा एखाद्या समितीची निर्मिती होऊ शकते आणि समितीला कालमर्यादा घालून अशा अर्जांचा विचार करायला सांगितले जाऊ शकते. परंतु पंधरा–पंधरा, वीस–वीस वर्षे दयेच्या अर्जावर विचारच न होणे ही गोष्टदेखील तितकीच गंभीर ठरते. आज एकूणच गुन्हेगारीचे प्रमाण प्रचंड वाढत असताना गुन्हेगारांविषयीचा अशा प्रकारचा दयाभाव धोकादायक ठरू शकतो. आपल्या लोकशाही व्यवस्थेत समाजाची सुरक्षितता ही काटेकोर कायदा सुरक्षा व्यवस्थेवरच अवलंबून आहे, हे लक्षात ठेवले पाहिजे.